# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०७/२०१८

**१) संगनमत करून सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी : –**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे मुलाकडे घराला ताला लावुन नागपुर येथे गेली होती यातील अज्ञात आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीत ठेवले १ चांदीचा आकडा वजन ३ ग्रॅम , चांदीचे पायात घालण्याचे २ जोडवे वजन १५ ग्रॅम, चांदीचा सिक्का वजन १० ग्रॅम व नगदी ३,०००/रु. असा एकुण ६,६५०/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी श्रीमती भागीरथी शामराव सांडेल वय ६० वर्ष रा. शाही कॉलोनी सिहोरा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५४,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना.लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी : –**

दिनांक ०१/००७/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी याने त्याची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ३१ क्यु ३१७९ किमती २०,०००/रु. ची लहरी बाबा मट आवारात ऊभी करून संतसंग कार्यक्रमा करीता मटात गेला असता, सतसंग आटोपल्याने मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी येवुन पाहीले असता, दिसुन आली नाही मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे असे फिर्यादी ईश्वर चैतराम शेंडे वय ४८ वर्ष रा. लाखांदुर रोड साकोली योचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत जनावरे निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने, तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०१/०७/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून त्याचे ताब्यातील महिद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ३६ एए ०१९१ मध्ये गौ वंश जातीचे ०९ जनावरे दाटी–वाटीने, निर्दयतेने भरून त्याचे कत्तल करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळुन आल्याने तसेच आरोपीतांनी फिर्यादीस वाहन का अडवीले म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी शैलेद्र सुरेद्र श्रीवास्तव वय ३२ वर्ष रा. स्वामी विवेकांनद वार्ड बैरागी वाडा भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथ कलम ९,९(अ)म.प्रा.सं.अधी. सहकलम ११(१)(ब) (ड) प्रा.कृ.वा.प्र. अधीनीय सहकलम ५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ईलमकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लांबाझोबी करुन व चावा घेवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी सौ. माधुरी प्रदीप पचारे वय २६ वर्ष रा. चिचोली ही आपले नविन घरी हजर असतांनी जखमीचे घरुन बेलदार हे सिमेंट नेत असतांना फिर्यादी जखमी हीने त्यांना सिमेंट नेवु नका आम्हाला सुध्दा सिमेंटची आवश्यकता आहे? यावरुन यातील आरोपी हीने फिर्यादी सोबत तोंडातोंडी भांडण केले व शिवीगाळ करुन लांबाझोबी केली आणि जखमीचे डावे हाताचे कोहणीला व डाव्या पायाच्या गुडग्याजवळ दाताने, चावा घेवुन जखमी केल्याने फिर्यादी बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**५) विज अंगावर पडून युवकाचा मृत्यु व दोन जखमी : –**

दिंनाक ०१/०७/२०१८ चे १४.०५ वाजता दरम्यान यातील मृतक शैलेश मधु नेवारे वय २४ वर्ष, रा. मुरली हा व जखमी हे विहीरीचे खोदकाम करित असतांना अचानक पाऊस सुरु झाला व मृतक हा आपल्या साथीदारासह झाडाखाली बसले असता मृतकच्या अंगावर विज पडल्याने जागीच मरण पावला व इतर २ मजुर जखमी झाल्याने फिर्यादी भाऊलाल श्रीराम नेवारे वय ४० वर्ष, रा. मुरली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साकुरे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**६) विष प्राशन केल्याने [illegible] इसमाचा मृत्यु : –**

दिनाकं ०१/०७/२०१८ चे ०१.३० वाजता दरम्यान यातील मृतक गजानन भोजराम गोंधुळे वय ४५ वर्ष, रा. सकरला याने दिनांक ३०/०६/२०१८ चे १०.०० वा. सुमारास विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करिता ग्रामीण रुग्णालय मोहाडी येथे नेले असता प्रथमोपचारा करुन तेथील डॉ. ने सामान्य रुग्णालय भंडारा येथे रेफर केल्याने त्यास दिनांक ०१/०७/२०१८ चे ०१.३० वाजता सुमारास सामान्य रुग्णालय येथे आकस्मिक कक्षात नेले असता डॉ. नी त्यास तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. लांजेवार पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी/देशी दारू अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, तुमसर, आंधळगाव व पवनी येथे अवैध हातभट्टी/देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३५ लिटर हातभट्टी दारू १८१० किलो सडवा+ ८० किलो मोहाफुल साहित्य किंमती २,०७,५५०/रु. तसेच ९०० लिटर देशी दारू+ १ स्कार्पिओ गाडी किमती ७,३०,०००/रु. असा एकुण किंमती ९,३७,५५०/रु चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १२ ईतर वाहनांवरती – १०९ केसेस करण्यात आले आहे.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.